(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. IX / Issue – II ISSN 2277-8063

# कोरोनाचे आंतरराष्ट्रीयस्तरावर झालेल्या परिणामांचे अध्ययन

**सोनाली मधुकर जाधव**

**संशोधक विद्यार्थिनी ,(एम. ए. द्वितीय वर्ष) राज्यशास्त्र विभाग सामाजिकशास्त्र प्रशाळा**

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव**

.......................................................................................................................................................

**प्रस्तावना :**१९३९ ते १९५४ जगाने पाहिलेमहायुद्धात व जवळपास सर्वच राष्ट्रांत सहभाग होता हे मान्य दोन परस्पर विरुद्ध विचारसरणी असलेल्या राष्ट्रांमध्ये झाले. हे युद्ध एवढे भयानक होती की या युद्धाचा परिणाम जगातील सर्वचस्तरावरझाला सकारात्मक परिणाम असा म्हणता येईल की या महायुद्धामुळे जगावरील ब्रिटिश राजवटीचा शेवट झाला. परंतु नकारात्मक परिणाम असे म्हणता येईल की यामुळे मानवी जीवन ढवळून निघाले या महायुद्धात तब्बल ८० लाख सैनिक मरण पावले, तसेच महायुद्धा पाळले जाणारे रसायनदारुगोळा ,,साधनसामग्री इत्यादी. बाबींचा मानवी जीवनावर मोठ्या प्रमाणावर परिणाम झाला की आपण त्याची किंमत .मोजावी लागली आणि झालीच पण वित्तहानी पण मोठ्या प्रमाणावर झाली व पुढील काळात मित्र राष्ट्रांनी म्हणून जगाच्या हितासाठी व मानवी जीवनाच्या सुरक्षितेसाठी संयुक्त राष्ट्र संघटनेची स्थापना १९४५ ला करण्यात आली. व पुढील काळात मोठ्या प्रमाणात जगात परस्पर सहकार्य व भूमिकेतून आंतरराष्ट्रीय तसेच प्रादेशिक संघटना स्थापन करण्यात आल्या मानव आणि तंत्रज्ञान व विज्ञानाच्या साह्याने प्रगती करण्यास सुरुवात केली शितयुद्ध संपल्यानंतर जगाची महासत्ता म्हणून अमेरिका हा देश पुढे आलापुढील काळात मानवाने जशीजशी . प्रगती केली. तेवढ्याच मोठ्या प्रमाणात नैसर्गिक बाबतीतही मानवाने हस्तक्षेप करण्यास सुरुवात केली व त्याचे दुष्परिणामही भोगावे लागले. व त्यामुळे मानवाला असंख्य आजाराचा देखिल सामना कराव लागला इतक्या मोठ्या प्रमाणावर होते की त्यांचा प्रभाव संपूर्ण जगावर झाला उदापोलि ,लोराके ,प्लेग .ओइत्यादी जगावर सर्वोच्च स्थान प्राप्त केले ,क्षयरोग ,. त्यातच १९९३ पासून चीन हा महासत्ता होण्याचे स्वप्न पाहत आहे व सध्या काळातील चीनमधील वुहान या शहरातून कोरोनाचेयाआजाराची सुरुवात झाली व या आजाराने बघताबघता संपूर्ण जगातील राष्टांनाविळखाघातलाय व त्याचाच परिणाम आंतरराष्ट्रीय राजकारणाला प्रभावितझालेलेआहे, तसेच या आजाराने आंतरराष्ट्रीय व प्रादेशिक संघटनांना सुद्धा प्रभावित केले आहे याबद्दलची माहिती सदर संशोधनात मांडण्यात आली आहे

**उद्दिष्टे**

1. कोरोना या जागतिक महारोगाबद्दल माहिती जाणून घेणे.
2. कोरोनासंदर्भात आंतरराष्ट्रीय संघटना कशा प्रकारे कार्य करीत आहे हे जाणून घेणे.
3. कोरोनाया महारोगाचा आंतरराष्ट्रीय राजकारणावर कशाप्रकारे प्रभाव पडत आहे याचे अध्ययन करणे.
4. कोरोनाया महारोगाचा जागतिक पातळीवर किती मोठ्या प्रमाणावरप्रादुर्भाव झाला याचे अध्ययन करणे.

**महत्व**

1. कोरोनाचे आंतरराष्ट्रीय राजकारणावर कशाप्रकारे प्रभाव पडतो हेजाणून घेणेमहत्त्वाचे ठरेल.
2. एखाद्या जागतिक महारोगाचा आंतरराष्ट्रीय पातळीवर मोठ्या प्रमाणावर प्रादुर्भाव होत असेल तर अशा परिस्थितीत आंतरराष्ट्रीय संघटना कोणकोणत्या उपाययोजना करते याचे अध्ययन करणे महत्त्वाचे ठरते.
3. कोरोनासारख्या महारोगराईला देश व आंतरराष्ट्रीय संघटना कशा प्रकारे सामोरे जातात हे जाणून घेणे महत्त्वाचे ठरते.

**अध्ययन पद्धत:** प्रस्तुत शोधनिबंध लिहिण्यासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला असून शोधनिबंधा साठी दुय्यम तथ्यांचा वापर केला गेला आहे तसेचकोरोनाचेव आंतरराष्ट्रीय राजकारण या विषयासंदर्भात वृत्तपत्रे, मासिके, ऑनलाईन आर्टिकल, विकिपीडिया तसेच आधार घेऊनदुय्यम तथ्यप्राप्त करण्यात आले आहेत

**कोरोना म्हणजे काय?:** Corona हा शब्द इंग्रजी भाषेतील नसून लॅटिन भाषेतला आहे याचा लॅटिन भाषेत अर्थ होतो crown(मुकुट)कारण या विषाणूला मुखडा सारखे टोकदार आवरण असते तसेच किरण आहे.आजाराचे नाव नसून विषाणूचे नाव आहे वैज्ञानिक नाव ServereActuleRespiratory SyndromeNovel CeronaVirus-2(SARS COV-2)म्हणजेच नवीन या विषाणू पासून होणारे आजारालाcovid-19 cerona virus disease -2019 असेम्हणतात.

1. **उगम-**covid-19 करोना व्हायरस हा विषाणू सर्वप्रथम चीनमधील वुहान या शहरात पाहण्यास आला हा विषाणू वटवाघुळामधून माणसांमध्ये आल्यानंतर पसरत पसरत राहिला हा विषाणू कोणत्याही प्रयोगशाळेत तयार केला नाही तो निसर्गातच तयार झाला आहे.
2. **कोण कोणत्या प्रदेशात हा विषाणू पसरू शकतो-**ज्या प्रदेशात लोक राहतात अशा सर्व ठिकाणी हा विषाणू पसरू शकतो थंड असो अथवा उष्ण. **लक्षणे-** ताप, सर्दी, श्वास घेताना अडचणी, थकवा कोरडा खोकला.
3. **हा विषाणू कसा पसरतो** जो व्यक्ती आजारी आहे असा व्यक्ती जवळ गेल्यास त्यांनी बोलल्यास, खोकल्यास, शिंकल्यास त्यातून बाहेर पडणारा द्रव बिंदु(droplet) मधून पसरतो नवीन अभ्यासातून असे स्पष्ट झाले आहे की केरोना ग्रस्त व्यक्ती त्याच्या बोलण्यातून देखील हा (aerosol) विषाणु पसरवु शकतो.
4. **किती लोकांना बाधित करू शकते-** या आजाराचा प्रजनन क्रमांक हा २ ७.आहे म्हणजेच एक बाधित व्यक्ती इतर २ते३ जणांना मदत करू शकतो.
5. **या विषाणू वर औषध-** या विषयांवर अद्याप तरी कोणतीही लस उपलब्ध नाही लस उपलब्ध होण्यास व तयार होण्यास एक ते दीड वर्षे लागू शकतात हा विषाणू स्वतःचा आकार बदलू शकतो म्हणून लस शोधणे अवघड आहे.

**आंतरराष्ट्रीय राजकारण**

**1. चीनची वाढती महत्वकांक्षा-** वुहानमध्ये नोव्हेंबर २४ मध्ये कोरोनाचे विषाणूची लागण असलेले रुग्ण समोर आले ते म्हणजे एक डिसेंबरला पहिला कोरोनाचा रुग्ण चीनमध्ये आढळला आणि वायरस असल्याची बातमी संपूर्ण जगाला १७ जानेवारी दिवशी कळले याच ४७ दिवसात चिनने स्वतःसोबत जवळपास सतरा देशात संक्रमण पोचवले आणि आतापर्यंत निवळ १ते२ देश असतील तिथे कोरोना पसरला नाही.

2. **वुहान कोरोना व्हायरस उद्रेक-** सुरुवातीला चीनची हुबंई प्रांताची राजधानी वुहानमध्ये सर्वात मोठी जीवितहानी घडली त्यात ८३५९५ रुग्ण आढळून आले त्यात १६ मार्चपर्यंत एकूण ३.०४२ इतके रुग्ण मृत्युमुखी पडले आणि महत्वाचे म्हणजे या विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी चीन ने सर्वात आधी वुहानमध्ये लॉकडाऊन लागू करण्यात आले व वुहान ही हुबंई प्रांताची राजधानी असून या राजधानीत या विषाणूचे रुग्ण कमी प्रमाणात आढळून आले त्यात वुहान शहर हे १करोड इतक्या मोठ्या प्रमाणात लोकसंख्या असलेल्या शहरात लॉकडाऊन करणे आणि हे चीनच्या अर्थव्यवस्थेला झटका बसण्यासारखे होते. म्हणजेच वुहानमधील संपूर्ण चीन मधील त्यात प्रमुख्याने व्यापार उद्योगधंदे व्यवसाय शैक्षणिक संस्था सामाजिक अशा विविध क्षेत्रांवर निर्बंध लागले आणि याचा मोठा फटका चीनला अदयाप पोहोचला आहे म्हणजेच आयात-निर्यात तिची कमतरता दिसून आली एकदया कंपनीकडे किंवा व्यवसायात चलन उपलब्ध झालेले नाही याचा परिणाम छोट्या-मोठ्या व्यवसायांवर दिसून आला

**3. देशांनाकोरोनाचा फटका-** आज संपूर्ण जगामध्ये भीतीचे दहशतीचे वातावरण आहे जिवनाविषयाची साशंकता आहे. याचे कारण आंतरराष्ट्रीय समुदायातील जवळपास १५०हुन अधिक देशामध्ये कोरोनाचे विषाणूचा भयानक संसर्ग झाला आहे सुमारे ३ लाखांहून अधिक लोकांना त्याचा संसर्ग झाला आहे मृत्युमुखी पडणाऱ्यांची संख्या १० लाखांहून अधिक आहे युरोपची ही अर्थव्यवस्था कोलमडली आहे जर्मनी, डग्रान्स इंग्लंड, स्पेन आणि इटली, इंग्लंड वगळता उर्वरित ४ देश युरोपियन युनियनचे आधारस्तंभ आहेत त्यांच्या अर्थव्यवस्था ही या संकटात सापडले आहेत भारतात ही याचा संसर्ग वाढत असल्याने निम्मा देश लॉकडाऊन करण्यात आला आहे एकंदरीत पाहता गेल्या जवळपास ५० वर्षांमध्ये संपूर्ण जगात एकाच वेळी इतकी भयंकर गंभीर परिस्थिती कधीच आली नव्हती यामुळे आजची परिस्थिती ओढवण्यासाठी कोन कारणीभूत असा प्रश्न उद्भवतो तर याचे कारण असे की अशा स्थितीत अवघ्या १०० दिवसांमध्ये या कोरोनाने अख्खे जग व्यापून टाकले आहे जगाला या संकटात ढकलण्यास कोण जबाबदार आहे तर तो फक्त चीन हा देश म्हणता येईल**.**

**3) चीन पूर्वपदावर-** चीनची सध्या परिस्थिती पाहता चिन हुकूमशाही राष्ट्र आहे तेथे एकाधिकारशाही आहे त्यामुळे तेथे मुक्त माध्यम नाहीत परिणामी आज चिन ने कोरोना वर नियंत्रण मिळवले आहे विजय प्राप्त केला आहे असे दिसून आले. चीन मधील कोरोना विषयक माहिती ही आता थंडावात चालले आहे.जगभरात५% चा मृत्युदर असताना तेथील मृत्युदर हा ३% झाला त्यानंतर तेथील कोरोनाचे रुग्णांचा मृत्यू 3 हजाराहून अधिक आहे आहेत आर्थिक परिस्थिती खालावलेला चीन ने स्वतःला सावरण्यासाठी उदारमतवादी भूमिका घेतली ती म्हणजे प्रत्यक्षात चीन औषधाची आणि वैद्यकीय साधनांची निर्यात करून भरभक्कम नफा मिळवत आहे खास करून युरोप आणि अमेरिका या दोन देशांना निर्यात केली जात आहे मास्क,

सिनेटायजर्स, अतिदक्षता विभागातील महत्त्वाची साधने, हेल्थवर्कर्स, डॉक्टर घालतात तेव्हा वैयक्तिक साधनांसाठीचेकिड्स हे सर्व चीनमध्ये तयार होते आणि तेथूनच त्यांची निर्यात होते त्यामुळे आजच्या घडीला किरणाचा सामना करण्यासाठी औषधे लागतात त्या सर्वांसाठी संपूर्ण जग चीनवर विसंबून आहे आणि चीन आर्थिक नफा मिळतो आहे आणि जगावर प्रभाव वाढवण्याचा प्रयत्न करीतआहे या अनुषंगाने चीन आपल्या केरोना परिस्थितीत अंतरराष्ट्रीय राजकारणावर आपला प्रभाव पाडणायावर जोर देत आहे.

4)**अर्थव्यवस्थेच्या केंद्रस्थानी चीन-** चीनमधील सध्या हालचालींचा आढावा घेता असे लक्षात येते की सहा आठवड्यांच्या खंडानंतर चीनमधील कारखाने आता पुन्हा उत्पादन सुरू करत आहेत त्यामुळे जागतिक आर्थिक मंदीची भीती दूर होण्याची शक्यता आहे यावर्षी जागतिक अर्थव्यवस्था २.३ टक्के दराने वाढेल असा केरोना संकटा आधीचा अंदाज आहे आणखी कारणामुळे हा दर ०.५ ते०.७५ टक्के कमी होईल अशी भीती होती.आजच्या घडीला चीन जागतिक अर्थव्यवस्थेचे एक एकमहत्त्वाचे केंद्र आहे आपल्यापैकी अनेकांना चिन खराब दर्जाच्या वस्तू निर्माण करणाऱ्या जागतिक कारखाना आहे अशी चीनची ओळख आहे पण चीन हा केवळ जगातील कारखानाच नाहीतर एक प्रचंड मोठी बाजार पेठ देखील आहे जागतिक व्यापारात चीनचा वाटा १२.५% चा आसपास आहे. चीनचा यात २.१ लाख कोटी डॉलर्स आणि निर्यात २.४ लाख कोटी डॉलर्स. जगातील सर्वाधिक व्यापार हा चीनबरोबर होतो २५ हून अधिक देशाच्या ३०टक्के पेक्षा जास्त व्यापार फक्त चीन बरोबरच होतो या अर्थकारणातील चीनची मध्यवर्ती स्थान लक्षात येईल व तेथील चीनला निर्यात करणारे देश तिथले कारखाने सुरू झाल्याने सुटकेचा निश्वास सोडतील.

**2.कोरोनाकडे अमेरिकेचा हलगर्जीपणा-** जगावर महशक्तीशाली असलेला अमेरिका सध्यास्थितीत कोरोनाया आजारासमोर हतबल झालेला दिसत आहे इटलीची स्थितीचीन स्पेनपेक्षाही भयंकर स्थिती ही उद्भवल्यास दिसून येत आहे याचा अभ्यास करताना असे लक्षात येते की जेव्हा पृथ्वीवर मोठे संकट येते तेव्हा त्यावेळेला अमेरिका जगाच्या संरक्षण करता म्हणून पुढे येतो आणि तेथील लोक जगाला वाचवतात तसेच अमेरिकेतील आरोग्य यंत्रणा किती प्रगत आहे हे आजवर सर्वच जाणून आहेत कोरोनाचे या विषाणूपासून अमेरिकेतील रुग्णांची संख्या दीडलाखाच्या आसपास गेली आहे तर ६१८५९ एवढे लोक मृत्यूमुखी पडले अत्यंत अमेरिकेतील प्रगत आरोग्य यंत्रणा असूनदेखील इतक्या व्यापक प्रमाणात कोरोनाचे प्रसार होणे म्हणजेच अमेरिकेचा कोरोना या आजाराकडे दुर्लक्ष केले असावे किंवा हलगर्जीपणा असावा अमेरिकेत कोरोनाचा पहिला रुग्ण २० जानेवारी रोजी आढळला अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी यावेळीअशी माहिती की दिली हा विषाणू अमेरिकेवर कसलाही परिणाम करू शकणार नाही दुसरीकडे दक्षिण कोरियाने कोरोनाचे रुग्ण सापडल्यावर लगेच ३० औषधी निर्मिती कंपन्यांना आमंत्रित करून बैठक घेतली या बैठकीत कंपन्यांना या चाचणीसाठीचे किट्स विकसित करण्यास सांगीतले त्यासंदर्भात कंपनीने कारवाई सुरू केली तिकडे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना मात्र सहा आठवड्यांनी जाग झाली आणि २७ फेब्रुवारीला अमेरिकेतील औषध निर्मिती कंपन्यांना दवाखान्यांना कोरोनाचे बाधितांचे चाचणी विकसित करण्यास सांगितले त्यांच्या पुढील सहा आठवड्याच्या काळात संपूर्ण जगभरात लॉकडाऊन त्यांची घोषणा केली

**१) चिनला छुपा विरोध-** कोरोनाचेचा कहर अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेवर मोठा प्रभाव पडणार आहे कारण आजवर प्रभावशाली महासत्ता असलेली अमेरिका कुठेतरी कोरोनाच्या प्रवाहामुळे आपल्या बलाढ्य शक्ती शास्त्र अशावेळी उपयोगात येत नसून फक्त अमेरीकेने चीनला प्रत्युत्तर म्हणून विरोधी मते व्यक्त केली यात अमेरिका आणि चीन चा संघर्षात वाढ होताना दिसतात परंतु अमेरिकेच्या औषधीक्षेत्राच्या नाड्या ही चीनकडे आहेत हे त्यांना माहीत आहे त्यामुळे हा संपूर्ण संघर्षांला पुढे नेने ट्रम यांनी टाळले या सर्व गोष्टींचा अभ्यास करता असे लक्षात येते की अमेरिका सारखे असतं चीनचा विरोध करू शकले नाही असे दिसते

**2)अमेरिका स्वत: जबाबदार-** ट्रम्प यांनी चीन संदर्भातील भूमिका बदलली आहे सध्या न्यूयॉर्क कोरोना ग्रस्तांचे केंद्र बनले आहे. परंतु न्यूयॉर्क गव्हर्नर आजही लोक डाऊन करण्यास तयार नाही त्यांच्यामते अमेरिकेच्या जीडीपीच्या १२% डीपीवरचा आहे जीडीपी न्यूयॉर्कचा आहे अमेरिकेच्या एकूण लोकसंख्येच्या दहा टक्के लोक राहता न्यूयॉर्क बंद पडल्यास अमेरिकेची अर्थव्यवस्था ढासळू शकते त्यामुळे डोनाल्ड ट्रम्प हे आज घडीला हातात असलेले दिसतात गेल्या तीन-चार वर्षात अमेरिकी अर्थव्यवस्थेची गाडी बऱ्यापैकी रुळावर आणली होती तेथील रोजगाराचा धरून चाला होता पण संकटामुळे कोरोनाचे अमेरिका पुन्हा एकटाच पडताना दिसतो आहे

**३.दक्षिण कोरिया स्वसंरक्षण आदर्श:** पूर्व आशियामधील दक्षिण कोरिया या देशांनी अमेरिका युरोपसारख्या प्रगत पश्चिमात्य देश कोरोनाचे सारख्या आजाराशी लढताना मेटाकुटीला आलेले दिसतात दक्षिण कोरिया मात्र कोरोनाचे लढ्याचा आदर्श जगाला दाखवून दिला आहे किंबहुना आज जागतिक आरोग्य संघटना ही दक्षिण कोरियाचा आदर्श घेत त्यांच्या धोरणानुसार कार्य करण्याचे ठरवले आहे हे त्रिसुत्री साखळी म्हणजे काय तर ट्रेस टेस्ट ट्रीट म्हणजेच कोरोनाचेचे रुग्ण शोधा उपचार करा चाचणी करा

**१.ट्रेस ⎕⎕ट्रि⎕** दक्षिण कोरिया कोरोनाचे विचार केला तर त्यागे कोरोनाचा पहिला रुग्ण झाल्यानंतर तेथील सरकारने केवळ कारवाई सुरू केली त्यांनी तिथल्या 15 महत्वाचं औषधी निर्माण कंपन्यांना चाचणीची किट विकसित करण्याच्या सूचना दिल्य ८ फेब्रुवारी पहिले ड्रेस उपलब्धही झाले त्यानंतर लगेच असते कोरोनाचे बाधित चाचण्या या सुरु झाल्या त्यांचा शोध घेणे ओळख पटवण्यात चाचणी करणे या टप्प्यात कोरोनाचेशी संघर्ष सुरू झाला

**२.चाचण्यांवर भर-** दक्षिण कोरिया आणि संपूर्ण देशात ६२० चाचणी केंद्र उभी केली त्यातून प्रतिदिवशी २० हजार चाचण्या केल्या दक्षिण कोरियाची लोकसंख्या ५ कोटी आहेत तर दर १० लाख लोकांमागे दर ५१०० चाचणी असा त्यांचा चाचण्यांवर भर आहे याउलट अमेरिकेतील स्थिती पाहिली तर तेथे १० लाख लोकांमागे ७८ लोकांची चाचणी केली जाते भारतामध्ये दर १० लाख लोकांमागे साधारण २०ते२५ लोकांची चाचणी केली जाते भारत आणि अमेरिका यांच्या तुलनेत दक्षिण कोरियाचा असल्यामुळे त्यांनी कमी कालावधीमध्ये अधिकाधिक कोरोनाचे बाधित यांचा शोध घेताना यानंतरचा महत्त्वाचा टप्पा असतो.

**३. तंत्रज्ञानावर भर:** कोरोनाचेचा प्रकोपवर नियंत्रण मिळवण्यासाठी दक्षिण कोरियाचेतंत्रज्ञानाचा अत्यंत योग्य वापर केला आहे कोरोनाचे स्पर्धेत रूग्ण ओळखण्यासाठी त्यांनी डिजिटल ट्र⎕ंग सिस्टीम विकसित केले आहे त्यासाठी अत्याधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा वापर केला आहे कोरोनाचे बाधित व्यक्ती ट्रक करण्यासाठी त्यांनी मोबाईलचा आधार घेतला आहे उदा. एखादा रुग्ण कोरोनाचे आहे तो बाहेर पडला असेल तर तो कुठे गेला कोण कोणाच्या संपर्कात गेला त्याच्या मोबाईल लोकेशन व मोबाईल इतिहासावरून जाणून घेतले गेले तसेच दक्षिण कोरियात क⎕लेस इकॉनोमी आहे म्हणजेच तेथे रोखीचे व्यवहार जवळपास होतच नाही तेथे डेबिट व क्रेडिटकार्डच्या माध्यमातून होतात त्यामुळे व्यक्ती कोणत्या ठिकाणी जाऊन डेबिट व क्रेडिट स्वाईप करत आहे गोष्टी ट्रक केल्या गेल्या त्यात त्यांनी त्यांचा शोध घेण्यासाठी अशाप्रकारे डेबिट व क्रेडिटकार्डचा ही उपयोग केला आहे या तंत्रज्ञानाचा उपयोग करून रुग्णांची संख्या आटोक्यात आणली.

**४. दक्षिण कोरियाचाआदर्श- A)नोलॉकडाऊन-** दक्षिण कोरियाचा मॉडेलचे वैशिष्ट्य म्हणजे तेथे लॉकडाऊन करण्यात आले नाही भारतानेही २१ दिवस ,चिनने ४० दिवस, युरोप, इटली, स्पेनयांनी संपूर्ण देश लॉकडाऊन केले आहे परंतु दक्षिण कोरियाने मात्र हा पर्याय स्वीकारला नाही न लॉकडाऊन करताही असल सोशल डिस्टन्स कसे ठेवता येईल याचा विचार त्यांनी गांभीर्याने केला कारण दक्षिण कोरियाला लॉकडाऊन परवडणारे नव्हते त्याचा उत्पादन, व व्यापारावर याचा नकळत परिणाम झाला असता त्यामुळे दक्षिण कोरियाने कोरोनाग्रस्तांची संख्या मर्यादित ठेवण्याचा लक्ष्य साध्य करण्यावर भर दिला आहे दुसरी गोष्ट म्हणजे दक्षिण कोरिया सारखे चाचणी केंद्र उभारणे कदाचीत इतर देशांना शक्य नसले तरी परंतु माहिती तंत्रज्ञानाचा वापर जसा दक्षिण कोरियाने केला गेला कसा वापर नक्कीच इतर देश करू शकतो काही देशांनी तंत्रज्ञानाची साधने दक्षिण कोरियाकडून मागवले आहेत उदा. भारत

**B)आरोग्य व्यवस्था उत्तम--** दक्षिण कोरियाची आरोग्य व्यवस्था अत्यंत उत्तम दर्जाचे आणि आधुनिक आहे २०१५ मध्ये मार्च नावाचा रोगाचा तडाख्यानंतर दक्षिण कोरियाने आपल्या वैद्यकीय सुविधांवर लक्ष केंद्रित करूनत्या प्रगत आणि अत्यंत उत्तम दर्जाच्या केल्या इतर देशांसाठीसुद्धा हा उत्तम धडा आहे तसेच केरोणानंतरच्या काळात देखील सर्व देशांनी आपले आरोग्य व्यवस्थेतील कमतरता दूर करण्याला प्राधान्य द्यायला हवे व दक्षिण कोरियाचा आदर्श घ्यायला हवा.

**आंतरराष्ट्रीय संघ⎕ा चे बदलते स्वरूप :**जगामध्ये जी२०,नाटो, युरोपियन युनियन, आशियान, ऑपेक,ओसीसी सार्क संघटना, संयुक्त राष्ट्र संघटना,जागतिक आरोग्य संघटना यासारख्या सर्वात प्रभावी आंतरराष्ट्रीय आणि प्रादेशिक संघटना या अस्तित्वात आहेत त्यांनी कोरोनाचा प्रादुर्भाव कालावधीमध्ये कोणत्या प्रतिक्रिया दर्शवतात हे पुढील प्रमाणे,

**१संयुक्त राष्ट्र संघ⎕ा .-**या संघटनेने कोरोनाचे विरुद्धचा लढात पुढाकार घेणे गरजेचे होते परंतु संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सुरक्षा परिषदेत कोरोनाचे संकटावर चर्चा करा असा प्रस्ताव आला तेव्हा रशिया आणि चीन यांना त्यांना विरोध केला त्यामुळे जगावर एवढे मोठे संकट येऊनही त्यावर या संघटनेत अद्याप साधी चर्चा देखील नाही.

**२. जागतिक आरोग्य संघटना-** चीनच्या वुहान मध्ये कोरोनाचे पहिला रुग्ण सापडला त्यात या संघटनेने म्हणजेच जागतिक आरोग्य संघटनेने त्याला जागतिक आरोग्य संघटनेने त्याला जागतिक महामारी असे घोषित केले ते करण्यासाठी त्यांनी ११मार्च उजाडले म्हणजे चीन च्या साडे तीन महिन्यानंतर डब्ल्यू एच ओ ने महामारी जाहीर केली वुहान मध्ये १७ नोव्हेंबर रोजी पहिला कोरोनाचेरुग्ण लक्षात आल्यानंतर२० डिसेंबरपर्यंत चीन ने काही कृती केली नाही त्यावेळीचिन ने हा संसर्गजन्य नसल्याचे सांगितले अशावेळी जागतिक आरोग्य संघटनेची चीनची बाजू उचलून धरणे अत्यंत चुकीचे आहे त्यामुळे अशा जागतिक संघटना तटस्थ राहिले पाहिजे होतेवज्यांना विकसनशील देशांमध्ये आरोग्याचे महत्त्वाचे काम करायचे आहे त्याच जर सत्ता संतुलनाचा भाग होत असतील किंवा राजकारणातील हत्यार म्हणून वापरले जात असतील तर जागतिक पातळीवर याच्या इतकी दुर्दैवी गोष्ट दुसरी नाही.

**३.सार्क संघटना-** सार्क संघटनेचा सदस्य देश असलेला भारत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सिंग करून या सदस्यदेशांशी संपर्क साधलावत्यांच्या प्रमुखांशी चर्चा करून यासाठी सामूहिक फंड निर्माण करण्याचा प्रस्ताव ठेवत १० दशलक्ष डॉलर एवढा मोठा फंड भारताने देऊ केला आहे या पाठोपाठ जी२० अध्यक्षपद असलेल्या सौदी अरेबिया शी संपर्क साधून कोरोनाचे विरुद्धच्या प्रयत्न करावे अशी विनंती देखील केली आहे तसेच चीनच्या कोरोनाचे प्रादुर्भाव वाढला तेव्हा भारताने पंधरा टन औषधे व इतर साधन सामुग्री चीनला पुरवली परंतु भारताने जेव्हा व्हेंटिलेटर मागणी केली तेव्हा चीनने उत्पादनात अडचणी असल्याबाबत सबब पुढे केली दुसरी गोष्ट म्हणजे भारत प्रादेशिक संघटनांच्या सर्वोच्च स्थानी आहे संघटनेतील सदस्य राष्ट्रांना भारताने मदत देऊ केली आहे भारताने मालदीव आणि नेपाळ या देशांमध्ये मदतीसाठी डॉक्टर पाठवले .यासारखे दक्षिण पूर्व आशियाई देशांना कोरोनाचेच्या संसर्गाचे परीक्षण पुण्यातील वायरलॉजी इन्स्टिट्यूट विकसित करून दिली तसेच अफगाणिस्तान ,भूतान,बांगलादेश आणि श्रीलंका यांच्यातील सामना करण्यासाठी भारताने आर्थिक मदत देऊ केली त्यांनी भारताला मदतीची विनंती केली आहे .अशा परिस्थितीत या अनुषंगाने आजच्या घडीला आशियान रीजनल ,नाटो ,आआसी ,युरोपियन युनियन ,फोरम 20-जी ,यासारख्या प्रादेशिक संघटना अस्तित्वात आहे की नाही अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

**४.आंतरराष्ट्रीय संघटना आणि राजकारण** आंतरराष्ट्रीय राजकाणात बहुराष्ट्रीय संस्था जागतिक आरोग्य संघटना मानव अधिकार समिती या सारख्या संघटना खरेतर स्वतंत्र असल्या पाहिजेत मात्र गेल्या काही वर्षात या संघटना आंतरराष्ट्रीय संघटनांचा भाग असल्याचे दिसते आहे विकसित महासत्तांच्या समीकरणाच्या राजकारणात व्यासपीठ होताना दिसतात तीच अवस्था जागतिक आरोग्य संघटनेची ही आता झालेलेआहे. अमेरिका आणि चीन यांच्यातील सत्ता संतुलनाचा राजकारणाचा एक भाग असल्याचे दिसून येत आहे या जागतिक स्तरावरील संघटनांच्या मुख्य प्रश्न आहे तो म्हणजे फंड त्यांना आवश्यक असलेला निधीजे देश पूर्वत असतात आणि मग या देशांची बाजू उचलून धरण्याचे काम या संघटना करतात जे अर्थातच दुर्दैवी आहे कधीकाळी अमेरिका जागतिक आरोग्य संघटनेला सर्वात जास्त निधी देत होता परंतु आता ती जागा चिन ने घेतले आहे त्यामुळे जागतिक आरोग्य संघटना सध्या चीनची बाजू घेताना दिसत आहेत. अशाप्रकारे कोरोनाचे या आजारामुळे संपूर्ण जगात कशाप्रकारे भीतीचे, वातावरण निर्माण झाले आहे त्याचा परिणाम आंतरराष्ट्रीय स्तरावर व तसेच आंतरराष्ट्रीय संघटनावर याचा प्रभाव कशाप्रकारे पडत आहे हे सदर शोधनिबंधात मांडण्यात आले.

**निष्कर्ष :** अमेरिकासारख्या तंत्रज्ञान व वैज्ञानिक दृष्ट्या प्रगत असलेला देश कोरोनाया माहाआजारा पुढे हतबल झालेला दिसतो., जागतिक आरोग्य संघटने वर संयुक्त राष्ट्र संघटनेचे स्थायी देश कुठेतरी दबाव आणताना दिसतात. ,जागतिक अर्थव्यवस्थेवर चीन आपली पकड मजबूत करण्याचा प्रयत्न करीत आहे असे दिसते. ,आंतरराष्ट्रीय व प्रादेशिक संघटना मधील सदस्य राष्ट्र सद्यस्थितीत आत्मकेंद्री बनले आहेत असे दिसून येते परंतु याला सार्क संघटना अपवाद आहे असे दिसते.

**संदर्भसूची**

८) दैनिक दिव्य मराठी . आर्टिकलदि. ७/४/२०२०

९) https://t.me/skdeolankar १/४/२०२०

१०) https://t.me/t.me /skdeolankar१६/३/२०२०

११) https://t.me/skdeolankar ६/४/२०२०

१२) HTTPS://maharashtra/7.com ५/४/२०२०